**अतित्वर्य/महत्वाचे** पुणे महानगरपालिका

<u>आजचे आज वाटणे</u> *** स्थायी समिती ***

**<u>कार्यपत्रिका क्रमांक ४३</u>**

स्थायी समितीची साप्ताहिक सभा **मंगळवार दि. १०/१/२०१७** रोजी सकाळी ११:३० (साडे अकरा) वाजता **महात्मा जोतिबा फुले सभागृहात** (स्थायी समिती सभागृहात) भरेल.

सदर सभेत खालील विषयांचा विचार होईल.

**<u>वृत्तांत कायम करणे.</u>**

## मा.सभासदांचे प्रस्ताव

**विषय क्र. २४२२**

मा.फारुक इनामदार व मा.ॲड्.रामचंद्र उर्फ चंदुशेठ कदम यांचे दि.७/१/२०१७ चे पत्र.

प्रभाग क्र. ४५ मधील सर्व्हे नं. २५/५,२५/६/२५/७ या ॲमिनिटी स्पेसमधील जागा विब्वेअर या इंग्रजी माध्यमाच्या शाळेस पार्किंगसाठी नाममात्र भाडयाने देण्यात यावी.

## माहितीसाठी आलेले विषय

**विषय क्र. २४२३**

उप आयुक्त, (परिमंडळ १) पुणे महानगरपालिका अधिनिस्त महा.सहा.आयुक्त, औंध क्षेत्रिय कार्यालयाकडील दि. १/१२/२०१६ ते दि. ३१/१२/२०१६ अखेर महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३(ड) नुसार मा.अति.महा.आयुक्त(ज) यांचे विषयपत्रासोबत जोडल्याप्रमाणे संविदा करार व तदनुषंगिक माहिती निदर्शनास आणणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(ज) यांचे जा.क्र. मआ/उआप१/१२७५ दि.५/१/२०१७ चे पत्र.

## सेवकवर्गाची प्रकरणे

**विषय क्र. २४२४**

पुणे महानगरपालिकेच्या कोथरुड क्षेत्रिय कार्यालयाकडे कामास असलेले श्री.निलेश शिवदास आढाव, हुद्दा– बिगारी यांच्या निलंबन कालावधी दि. १०/१०/२०१६ रोजी चौथी सहामाही पुर्ण होत असलयामुळे मनपा सेवा विनियम क्र. ५८ नुसार सदरची बाब निर्दशनास आणणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(ज) यांचे जा.क्र. मआ/साप्र/११८५ दि.३०/१२/२०१६ चे पत्र.

**विषय क्र. २४२५**

पुणे महानगरपालिकेच्या महापालिका सहाय्यक आयुक्त कार्यालय, भवानी पेठ कडील श्री.अमोल विठ्ठल सकर, हुद्दा – बिगारी यांच्या निलंबनास दि. २९/९/२०१६ रोजी आठवी सहामाही पूर्ण झाली असून सदरची बाब मनपा सेवा विनियम क्र. ५८ नुसार निर्दशनास आणणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(ज) यांचे जा.क्र. मआ/साप्र/११८६ दि.३०/१२/२०१६ चे पत्र.

**विषय क्र. २४२६**

पुणे महानगरपालिकेच्या सुरक्षा विभागाकडील श्री.सतीश संभाजी वाघमारे, सुरक्षा रखवालदार, वर्ग–४ यांच्या निलंबन कालावधीची दि. २५/१/२०१६ पासून दि. २४/७/२०१६ पर्यंतची दहावी सहामाही पूर्ण झाली असून सदरची बाब मनपा सेवा विनियम मधील प्रकरण ६ वे क्र. ५८ नुसार निर्दशनास आणणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(ज) यांचे जा.क्र. मआ/साप्र/११८७ दि.३०/१२/२०१६ चे पत्र.

## संकिर्ण

**विषय क्र. २४२७**

पुणे मनपाच्या वतीने शहरात विविध ठिकाणी बांधणेत आलेल्या भाजी मंडईचे गाळे स्थानिक महिला बचत गटाला मासिक रुपये १,५००/– दराने पुढील दोन वर्षासाठी प्रायोगिक तत्वावर देणेबाबत मा.गणेश बिडकर, मा.ॲड्.किशोर शिंदे व मा.अशोक हरणावळ यांचे दि. ६/१/२०१७ चे पत्रावर झालेला मा.पक्षनेते सभा दि.६/१/२०१७ चा निर्णय विचारासाठी.

**विषय क्र. २४२८**

भुयारी मार्गामध्ये असणाऱ्या जागा पुणे शहरातील बचत गटातील गरजू महिलांना भाजी विक्री करीता रुपये १,५००/- अल्प दर भाडे आकारणी करुन देण्यात यावे. संबंधितांने मेंटेनन्सचा खर्च संबंधितांनी करावा व प्रायोगिक तत्वावर दोन वर्षांसाठी देणेबाबत मा.शंकर केमसे, सभागृह नेता व मा.ॲड्.किशोर शिंदे यांचे दि. ६/१/२०१७ चे पत्रावर झालेला मा.पक्षनेते सभा दि.६/१/२०१७ चा निर्णय विचारासाठी.

**विषय क्र. २४२९**

गोपाळकृष्ण गोखले यांचे नावाचा आदर्श संसदपटु पुरस्कार १९ फेब्रुवारी ला करणेत यावा. सदरचा पुरस्कार मा.ना.राष्ट्रपती महोदयांचे हस्ते देण्यात यावा. तसेच सदरच्या पुरस्कार निवड समितीमध्ये मा.पक्षनेते, पदाधिकारी मा.सदानंद मोरे व मा.उल्हासदादा पवार यांना घेणेत यावे याबाबत मा.शंकर केमसे, सभागृह नेता व मा.दत्ता धनकवडे यांचे दि.६/१/२०१७ चे पत्रावर झालेला मा.पक्षनेते सभा दि.६/१/२०१७ चा निर्णय विचारासाठी.

**सुनिल पारखी**
**नगरसचिव,**
**पुणे महानगरपालिका.**

**(टिप :– प्रस्तुत कार्यपत्रिकेवरील विषयांची कागदपत्रे (डॉकेटस) नगरसचिव यांच्या कार्यालयात वाचण्यासाठी ठेवली आहेत.)**